# धुळे जिल्ह्यात रब्बी ज्वारीतील कणसावरील अळीचा हल्ला;- वेळीच उपाययोजना करण्याचे तज्ज्ञांचे आवाहन

धुळे जिल्ह्यात रब्बी हंगामातील ज्वारीतील कणसावरील अळी (Helicoverpa armigera) या किडीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत आहे. हरभरा पिकावरील अळीची एक पिढी पूर्ण झाल्यानंतर ही अळी आता ज्वारीकडे वळली असून, यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी विज्ञान केंद्र (KVK) धुळे येथील पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील, तालुका कृषी अधिकारी माधुरी गायकवाड आणि कृषी मंडळ अधिकारी दीपक जाधव यांनी बाधित क्षेत्राची पाहणी करून शेतकऱ्यांना मार्गदर्शक सूचना केल्या आहेत.

डॉ. पंकज पाटील यांच्या निरीक्षणानुसार, ज्या ज्वारीच्या वाणांचे कणीस घट्ट (कॉम्पॅक्ट) आहे, अशा ठिकाणी अळ्यांना लपण्यासाठी जागा मिळत असल्याने प्रादुर्भाव जास्त आहे. विशेषतः बागायती क्षेत्रातील ज्वारीवर ही कीड मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

**कृषी तज्ज्ञांनी सुचवलेल्या उपाययोजना:**

**१. जैविक नियंत्रण (पर्यावरणपूरक पर्याय):**

- कणसांवरील अळ्या हाताने कणीस झटकून गोळा कराव्यात व नष्ट कराव्यात.
- जमिनीत ओलावा असल्यास **मेटारायझियम ॲनिसोप्लिए किंवा ब्यूव्हेरिया बॅसियाना** या जैविक बुरशीजन्य कीटकनाशकांचा वापर करावा.
- काढणी जवळ आलेल्या पिकावर ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी.

**२. रासायनिक नियंत्रण व ड्रोनचा वापर:**

- अतिप्रादुर्भाव असल्यास लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (Lambda-cyhalothrin) ५ ते १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- मोठ्या क्षेत्रासाठी ड्रोनद्वारे १०० मि.ली. प्रति एकर या प्रमाणात फवारणी करणे फायदेशीर ठरेल.

**प्रतीक्षा कालावधी आणि चारा सुरक्षेची काळजी घ्या**

ज्या शेतकऱ्यांचे पीक पुढील १५ ते २० दिवसांत काढणीला येणार आहे, त्यांनी रासायनिक औषधे टाळून निंबोळी अर्काचा वापर करावा, जेणेकरून धान्यात विषारी अंश राहणार नाहीत. तसेच, रासायनिक फवारणी केलेल्या ज्वारीचा चारा जनावरांना देऊ नये, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र धुळे आणि कृषी विभाग यांनी केले आहे.

*"शेतकऱ्यांनी बाजारात उपलब्ध असलेले कोणतेही कीटकनाशक न वापरता, अन्नासाठी वापरल्या जाणाऱ्या पिकावर कमी 'प्रतीक्षा कालावधी (वेटिंग पिरियड)' असलेलीच औषधे वापरावीत, जेणेकरून अन्नसुरक्षा बाधित होणार नाही."*

*— डॉ. पंकज पाटील, शास्त्रज्ञ, केव्हीके धुळे*
*मो. ९६०४०८०८१६*




निमगूळ-बाभरे ता. धुळे येथे मार्गदर्शन करताना डॉ. पंकज पाटील आणि कृषि विभागाचे अधिकारी




रब्बी रब्बी ज्वारीतील कणसावरील अळी ची पाहणी करताना डॉ. पंकज पाटील आणि कृषि विभागाचे अधिकारी